**मे. उच्च्यन्यायालय, दिवाणी अपीली अधिकारिता, मुंबई, यांचे न्यायालयात.**

**जनहित याचिका क्रमांक १७६/ २०१२**

१ श्री राजेश मधुकर पंडित

२ श्री नागसेन( निशिकांत) मुरलीधर पगारे

३ श्री जगबीर निर्मल सिंग ........याचिकाकर्ते

वि.

१ नाशिक महानगरपालिका

२ आयुक्त, नाशिक महानगरपालिका

३ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ

४ भारत सरकार, द्वारा संचालक, प्रदूषण नियंत्रण

५ महाराष्ट्र राज्य

६ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ......... ........जाब देणार

श्री प्रवर्तक पाठक, याचिकाकर्त्या साठी

श्री एम. एल. पाटील, जाब देणार १ व २ साठी

श्री आर. बी. रघुवंशी...ऋतुजा आंबेकर यांच्या सूचनेवरून, जाब देणार ३ साठी

श्री डी. ए. नलावडे सोबत श्री रवींद्र लोखंडे, जाब देणार ४ साठी

श्री ए. बी. वग्यानी, अतिरिक्त सरकारी अभिवक्ता, सोबत श्री प्रशांत दरांडे, सरकारी अभिवक्त्याचे सहाय्यक, जाब देणार ५ साठी

श्री पी. पी. चव्हान सोबत कु. श्यामली गद्रे, मे. लिटल अँड कं. यांच्या सूचनेवरून,जाब देणार ६ साठी

कु कोमल कालवापुडी तांत्रिक सहाय्यक, सीएसआयआर-निरी, न्यायालयात उपस्थित.

गणपूर्ती: न्या. ए.एस.ओक आणि न्या.एस.सी.गुप्ते

निवेदने ऐकण्याचा दिनांक : २४ डिसेंबर, २०१३

आदेश घोषित केल्याचा दिनांक: मार्च, २०१४

आदेश (प्रतिन्या. ए. एस. ओक)

१. गोदावरी गंगा नदीनंतर भारता मधील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात लांब नदी आहे. तिला लोकार्थाने दक्षिण गंगा म्हणतात. हि याचिका गोदावरी नदीच्या कायाकल्पाच्या संबंधाने महत्वाचे मुद्दे उपस्थित करते. गोदावरी नदी नाशिक मधील पाणी पुरवठ्याचे महत्वाचे स्रोत आहे. औद्योगिक व घरगुती कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी देखील तिचा उपयोग होतो.

२. याचिकेमध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नांचा विचार करता आम्ही आदेश जारी करतो.

३. विधिज्ञ श्री. एम. एल. पाटील जाब देणार १ व २ साठी सूचनेच्या अंमलबजावणीचा हक्क सोडत आहेत. जाब देणार ३ च्या वतीने विधिज्ञ श्री आर. बी. रघुवंशी सूचनेच्या अंमलबजावणीचा हक्क सोडत आहेत. जाब देणार ४ च्या वतीने विधिज्ञ सूचनेच्या अंमलबजावणीचा हक्क सोडत आहेत. जाब देणार ५ च्या वतीने विधिज्ञ आणि जाब देणार ६ च्या वतीने विधिज्ञ सूचनेच्या अंमलबजावणीचा हक्क सोडत आहेत.

४. या न्यायालयाने वेळोवेळी तुतातुर्त अंतरिम आदेशाच्या स्वरुपात विविध निर्देश जारी केलेले आहेत. अंतरिम निर्देश जारी करण्याच्या प्रश्नाविषयी आम्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतले आहे. राष्ट्रीय अभियांत्रिकी संशोधन संस्थे चे (संक्षिप्त, निरी) प्रतिनिधी सुद्धा हजर होते.

५. याचिकाकर्ते भारतीय नागरिक असून नाशिकचे रहिवासी आहेत. प्रदूषित गोदावरी नदी स्वच्छ करण्याकरता जाब देणारांना निर्देश देणे हि मुख्य मदत या याचिकेत मागितलेली आहे. विविध इतर परिणामस्वरूप मागण्या या याचिकेत केल्या आहेत. दाखल कागदपत्रावरून असे दिसते कि नदी पश्चिमेकडून दक्षिणेकडे वाहते. महाराष्ट्र, छत्तीसगड, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, आणि ओरिसा या सहा राज्यामध्ये नदीचे पाणलोट क्षेत्र आहे. इंद्रावती, प्रवरा, वैनगंगा, कन्हान, पेंच, वर्धा आणि पेनगंगा या सारख्या नद्या गोदावरी नदीच्या रचनेत मध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी ओततात. २०१२ या वर्षापर्यंत गोदावरी नदीच्या खोऱ्यात ३५० मोठी किंवा मध्यम धरणे आणि बंधारे बांधले होते. अनेक पवित्र स्थाने नाशिक येथील गोदावरी नदीच्या काठी वसले आहेत. नाशिक येथील गोदावरी नदीच्या काठी दर १२ वर्षांनी कुंभ मेळ्याचे आयोजन केले जाते जे लाखो यात्रेकरूंना आकर्षित करते. कुंभमेळ्याचा मोठा कार्यक्रम आता जुलै-सप्टेंबर २०१५ मध्ये निश्चित केला आहे.

६ नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाले आहे या बद्दल पक्षकारात वाद नाही. अनेक कारणामुळे मोठ्या प्रमाणात जल प्रदूषण झाले आहे. नदीच्या किनाऱ्यावर सोमेश्वर मंदिर, नवश्या गणपती सारखी पवित्र ठिकाणे आहेत. लक्ष्मण कुंड, राम कुंड इ.. सारखी सर्वज्ञात धार्मिक स्थळे आहेत. गोदावरीच्या काठी आणि नाशिकमध्ये आणि सभोवताली लाखो भाविक या स्थळांना व घाटांना भेट देतात. त्यापैकी बरेचजण नदीत अस्थी विसर्जन करतात. त्यापैकी अनेकजण सामुदाईक स्नान करतात. प्रेतसंस्कारा सारखे 'दशक्रिया विधी' पार पडतात. नाशिक येथे सातपूर आणि अंबड ही दोन औद्योगिक क्षेत्रे आहेत. असा आरोप आहे कि एमआयडीसी क्षेत्रात निर्माण झालेल्या औद्योगिक कचऱ्याच्या अभिक्रियेसाठी सीइपीटी बांधलेली नाही. औद्योगिक आणि घरगुती कचऱ्याच्या विल्हेवाटी करिता नदी वापरली जाते. नाशिक शहराच्या बाहेर, नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर, मोठ्या प्रमाणात, शेती उद्योग केले जातात. शिवाय नाशिक शहर सतत वाढत आहे. नाशिकमध्ये आणि सभोवताली मोठ्या संख्येने उद्योग उभारले आहेत. नाशिकमध्ये लोकसंख्या वाढीचा स्फोट होत आहे. प्रदूषणाची कारणे असलेल्या या बाबी शिवाय, सामान्य नागरिकांच्या कृत्यांनी देखील नदीच्या परिसंस्थेवर/पारिस्थितीकीवर विपरीत परिणाम केले आहेत.

७ या न्यायालयाने वेळोवेळी जारी केलेल्या तूर्तातूर्त निर्देशांचे अवलोकन आम्ही केले आहे. विविध पातळीवर हि समस्या हाताळावी लागेल. प्रदूषणास कारणीभूत असलेली मुख्य बाब मानवी उद्योग हि आहे यावर या न्यायालयासमोर उपस्थित पक्षकार वादविवाद करू शकले नाहीत. विविध धार्मिक आणि इतर क्रिया  नदीच्या प्रदूषणास अनेक वर्षे कारणीभूत ठरत आहेत. पर्यावरण प्रदूषण मुक्त ठेवण्यासंबंधी संवेदनाचा अभाव आहे.

८ भारतीय घटनेचे कलम ४८ अे १९७६ या वर्षी शासकीय धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांचा एक भाग बनवले होते, जे नमूद करते कि राज्य शासन पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी प्रयत्न करेल. भारतीय घटनेमध्ये १९७६ या वर्षी मुलभूत कर्तव्यांचा भाग ६अे अंतर्भूत केला होता. भारतीय घटनेचे कलम ५१अे नागरिकांच्या मुलभूत कर्तव्यांची तरतूद करते. कलम ५१ अे चे उपकलम (जी) असे वाचले जाते:

५१अे.  मुलभूत कर्तव्ये.---प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य आहे कि–

(ए) ....................................

(बी) ....................................

(सी) ....................................

(डी) ....................................

(इ) ....................................

(एफ) ....................................

(जी) “वने, तळे, नद्या आणि वन्यजीव या सकट नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणे आणि जिवंत प्राणीमात्राप्रति दया दाखवणे.”

९. सर्वोच्च न्यायालयाने वारंवार अशी भूमिका घेतली आहे कि सार्वजनिक कायद्याचे तत्व भारताला लागू आहे. **एम.सी.मेहता वि.कमलनाथ** [(१९९७)१ एससीसी ३८८]  या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने या प्रकारे अभिनिर्धारित केले:

> ३४. इंग्लिश कॉमन लॉ वर आधारित असलेली आपली न्यायिक प्रणाली सार्वजनिक न्यासाचे तत्व हे कायदेशास्त्राचा भाग म्हणून अंतर्भाव करते. स्वाभाविकपणे सार्वजनिक वापर आणि उपभोगासाठी असलेल्या सर्व नैसर्गिक साधन संपत्तीचे शासन हे विश्वस्त आहे. समुद्र किनारे, वाहते पाणी, हवा, जंगले, पर्यावरणीय भंगुर भूमी यांची  जनता लाभार्थी आहे. नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण करणे या कायद्यान्तर्गत कर्तव्यानुसार शासन हे विश्वस्त आहे. सार्वजनिक वापरासाठी असलेली हि साधन संपत्ती खाजगी मालमत्तेमध्ये रुपांतरीत होऊ शकत नाही.
>
> ३५. आम्हास हे ज्ञात आहे कि या प्रकरणात सादर केलेले मुद्दे,  जे आपल्या नद्या, वने, उद्याने आणि मोकळ्या जमिनी त्यांच्या मूळ शुद्ध रुपात सुरक्षित ठेवतील आणि ज्यांना  प्रशासकीय जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत आणि ज्यांना वाढत्या बिकट

समाजाच्या बदलत्या गरजांच्या दबावाखाली, आतापर्यंत बदलास अनतिक्रमणीय वाटल्या जाणाऱ्या मोकळ्या जमिनीवर, काही प्रमाणात अतिक्रमण करणे आवश्यक वाटते, अशा जनतेच्या सदस्यांमधील अभिजात संघर्ष दर्शवितात. कोणत्याही प्रकरणात हा संघर्ष सोडवणे हे न्यायपालीकेचे काम नसून कायदेमंडळाचे आहे. जर संसदेने किंवा राज्य कायदेमंडळानी केलेला कायदा असेल तर, घटने अंतर्गत न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधिकारात कायदेमंडळाचा हेतू निश्चित करण्याचे साधन, न्यायालये होऊ शकतात. परंतु कोणताही कायदा नसताना प्रशासन, सार्वजनिक न्यासाच्या तत्वांतर्गत काम करताना, नैसर्गिक साधनसंपत्तीचा त्याग करू शकत नाही आणि त्यांचे खाजगी मालमत्तेमध्ये किंवा व्यावसाईक वापराकरिता रुपांतर करू शकत नाही. जर न्यायालयांना प्रामाणिकपणे, सार्वजनिक भल्यासाठी आणि सार्वजनिक हितासाठी या साधनसंपत्तीवर अतिक्रमण करण्याची गरज वाटली नाही तर आपल्या देशाची नैसर्गिक साधनसंपत्ती, पर्यावरण, परिसंस्था यांचा सौंदर्यशास्त्रविषयक उपयोग आणि त्यांचे शुद्ध वैभव खाजगी, व्यावसाईक किंवा इतर उपयोगासाठी झिजवण्यास परवानगी दिली जाऊ शकत नाही."

**फोमेंटो रिसोर्ट्स आणि हॉटेल्स लि. वि. मिन्गुएल मार्टिन्स** [ ( २००९)३ SCC 571 ] या प्रकरणातील दुसऱ्या निर्णयात सर्वोच्च्य न्यायालयाने असे ठरवले कि:

" ५९. पर्यावरण आणि परिसंस्थांच्या संरक्षणाच्या आवश्यकतेची भारतीय समाजास अतिप्राचीन काळापासून जाणीव आहे. सामाजिक जीवनाचा मुख्य उद्देश " निसर्गाशी एकोप्याने राहणे" हा राहिला आहे. भारताचे साधू आणि संत वनात राहिले आहेत. वेद, उपनिषदे, स्मृती इ. मधील त्यांची शिकवण वनस्पती, झाडे, आकाश, भूमी, वायू, जल आणि जीवनाच्या प्रत्येक रूपाविषयीच्या आदराची पुरेशी साक्ष आहे. त्यांचे संरक्षण हे प्रत्येकाचे पवित्र कर्तव्य आहे असेच मानले गेले होते. वृक्ष, नद्या , समुद्र, जे सगळ्या सजीवांच्या मालकीचे आहेत असे मानले जाऊन त्यांची त्याकाळी लोकांनी पूजा केली. पालकांनी आणि आजोबा-आजींनी त्याच्या मुलांना पर्यावरण स्वच्छ ठेवणे आणि पृथ्वी, नद्या, समुद्र, वने, वनस्पती, प्राणिजात आणि प्रत्येक सजीव प्रजातींचे संरक्षण करण्याच्या गरजेविषयी शिकवले होते.

६०. भारतीय राज्य घटना, जी २६-१-१९५० रोजी लागु झाली, त्या मधे पर्यावरण आणि परिसंस्थांचे संरक्षण करणे राज्यांवर बंधनकारक करणारी तरतूद नव्हती. परंतु लोकांनी निसर्ग, नैसर्गिक साधनसंपत्तीचा आदर ठेवणे, पर्यावरण आणि परिसंस्थांचे संरक्षण करणे सामाजिक कर्तव्य म्हणून चालू ठेवले. स्वातंत्र्या नंतर जवळपास तीन दशकांनी कायदे मंडळानी पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचे, जंगले आणि वन्यजीवनाच्या संरक्षणाचे महत्व जाणले आणि कलम ४८-अे राज्य घटनेच्या विभाग-४ मधे ४२ व्या घटनादुरुस्ती कायदा, १९७६ अन्वये समाविष्ट केले ज्यायोगे राज्यांवर "पर्यावरण

संरक्षण व संवर्धन तसेच, जंगले आणि वन्यजीवनाच्या संरक्षणासाठी प्रयत्न करण्याचे" कर्तव्य लादले. त्याच घटनादुरुस्तीने घटनेच्या विभाग-४ मधे कलम ५१-अे समाविष्ट केले गेले जे प्रत्येक नागरिकाच्या मुलभूत कर्तव्यांची यादी देते. कलम ५१-अे(जी) घोषित करते कि प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य आहे कि

> "वने, तळे, नद्या आणि वन्यजीव या सकट नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणे आणि जिवंत प्राणीमात्रा प्रति दया दाखवणे."

त्यानंतर न्यायालयांनी वारंवार ४८-अे व ५१-अे या कलमांचे पर्यावरण आणि परिसंस्थांचे संरक्षण करण्यासाठी सहाय्य घेतले आणि राज्यांना जंगले, नद्या यांच्या संरक्षणा करिता कृती करणे तसेच प्रदुषण विरोधी उपाययोजना करण्यासाठी सक्ती करणारे अनेक आदेश जनहित याचिकांमधे पारित केले.

६१. या न्यायालयाने सार्वजनिक न्यासाच्या तत्वाचे महत्व मान्य केले आणि नैसर्गिक साधनसंपत्ती, ज्या सार्वजनिक मालमत्ता म्हणून मानल्या गेल्या आहेत आणि विश्वस्त या नात्याने सरकारने धारण केल्या आहेत, त्यांचे संरक्षण करण्यासाठी ते तत्व लागू केले."

१०. जाब देणार नाशिक शहराची महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ भारतीय राज्य घटनेच्या कलम १२ प्रमाणे राज्य( सरकार) आहेत आणि म्हणून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन करणे त्यांचे कर्तव्य आहे. तलाव आणि नद्या सकट नैसर्गिक पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन करण्याचे नागरिकांचे सुसंगत/ मिळतेजुळते कर्तव्य आहे.

११. दाखल विविध अहवालांच्या अवलोकनानंतर आम्ही हे निरीक्षण केले पाहिजे कि गोदावरी नदीमधील प्रदूषण नियंत्रित करणे एक विशाल काम आहे. एका बाजूला राज्य सरकारचे कर्तव्य पार पाडण्यात अपयश आहे तर दुसरीकडे भारतीय राज्य घटनेच्या कलम ५१-अे(जी) मधील मुलभूत कर्तव्य पार पाडण्यात नागरिकांचे अपयश आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम २१ अंतर्गत मुलभूत हक्काचा भाग म्हणून प्रत्येक नागरिकास प्रदूषण मुक्त पर्यावरणाचा हक्क आहे. या हक्काचा दर्जा नागरिकांनी त्यांचे मुलभूत कर्तव्य, विशेष करून भारतीय राज्य घटनेच्या कलम ५१-अे(जी) मध्ये समाविष्ट केलेले कर्तव्य बजावण्यावर अवलंबून आहे.

१२. आम्हास याची नोंद घेतली पाहिजे कि या न्यायालयाने गोदावरी नदीची शुद्धता व ति चांगल्या अवस्थेत ठेवण्यासाठी व्यापक कृती आराखडा तयार करण्याकरिता निरीची नियुक्ती केली आहे. निरीने दाखल केलेला प्राथमिक मूल्यमापन अहवाल आहे. निरीने दाखल केलेला, तुरंत कृती करण्यासाठी विशिष्ट निरीक्षणे व शिफारशी नोंदविलेला, पुरवणी अहवाल आहे.

जुलै-सप्टेंबर,२०१५ मधील  आगामी कुंभमेळ्याचा विचार करता या न्यायालयाने निरीस कुंभमेळ्याचा विषय हाताळण्या साठी कृती आराखडा दाखल करण्यास सांगितले. त्यानुसार निरीने तिसरा अहवाल दाखल केला आहे. निरीचा हा अहवाल देखील तिच्या पूर्वीच्या अहवालाच्या अंमलबजावणीच्या स्थिती विषयी आहे.

१३. समस्येची व्यापकता समजून घेण्यासाठी निरीने दाखल केलेल्या पहिल्या अहवालाचा संदर्भ घेतला पाहिजे. हा अहवाल नाशिक शहरातील स्वच्छता, गटार व्यवस्था, सांडपाणी अभिक्रिया  सारख्या  सर्व बाबी हाताळतो. तो नाशिकचा घनकचरा व्यवस्थापन आराखडा देखील हाताळतो. या अहवालातील निरीच्या शिफारशीचा संदर्भ घेणे हे देखील महत्वाचे होईल.

**"शिफारशी"—**

- गंगापूर धरणातील पाणी वाटपाचे वेळापत्रक बदलावे लागेल  ज्यायोगे धरणाच्या खालच्या भागात कमीत कमी परिस्थितीकीय किंवा पर्यावरणीय प्रवाह उपलब्ध असेल.
- नदीतील किमान प्रवाहाची उपलब्धता लक्षात घेता, अभिक्रीत सांडपाण्याची   अपेक्षित सौम्यता, पृथक्करण आणि विघटन होत नाही. यामुळे अे II या विशिष्ट वापरासाठी असलेल्या जल गुणवत्ता मापकाची पुर्तता होत नाही. अभिक्रीत सांडपाणी बाहेर टाकण्यासाठी एमपीसीबी ने अधिक कडक मापके लादली पाहिजेत.
- लोकांकडून कपडे वा वाहने धुण्यासाठी नदीचा  गैरवापर थांबविण्याकरिता घेतलेल्या प्रयत्नांना बळकटी आणली पाहिजे.
- सांडपाणी परिणामकारकपणे गोळा करणे आणि त्याचे एसटीपी कडे स्थानांतर करणे प्राधान्याने हाती घेतले पाहिजे.
- मैला अभिक्रिया उपकरणांचे कार्य सुधारले पाहिजे.
- एसटीपी कडून येणाऱ्या अभिक्रीत सांडपाण्याचा उद्योगांनी किंवा सिंचना करता पुनर्वापर केला पाहिजे. सांडपाण्याची  गुणवत्ता सुधारल्याने बागकामासाठी आणि इतर कामासाठी देखील पारणी वापरले जाऊ शकते. यामुळे नदीच्या प्रवाहामध्ये प्रदुषकांच्या प्रवेशालाही आळा बसेल.
- एसटीपी कडून येणाऱ्या अभिक्रीत सांडपाण्याचे सिंचना करता परतचक्र व पुनर्वापर आणि तेवढाच प्रवाह नदीमधे स्थानांतर करण्याची शिफारस केली आहे.
- एमआयडीसी क्षेत्रात सांडपाणी निर्माण करणाऱ्या उद्योगांची यादी वैयक्तिकरित्या स्थापित  इटीपीच्या  तपशिलासकट एमआयडीसी अधिकाऱ्यांनी निरीला उपलब्ध करून दिली पाहिजे.
- जल प्रदूषण करणाऱ्या  उद्योगांसाठी एमआयडीसीने  समाईक मैला अभिक्रिया उपकरण  बांधले पाहिजे आणि त्याच्या  कार्यावर  नियमितपणे देखरेख ठेवली पाहिजे.

- एमआयडीसी क्षेत्रात वैयक्तिक उद्योगांनी बांधलेल्या व कार्यान्वयित केलेल्या इटीपी वर एमपीसीबीनी देखरेख ठेवली पाहिजे.
- भक्तांसाठी स्वच्छतेच्या सुविधा वाढवण्याची गरज आहे. जेथे उघड मलविसर्जन सर्रास आहे त्या भागात सुलभ शौचालय सारख्या सुविधा बांधल्या पाहिजेत.
- 'दशक्रिया' विधी करण्यासाठी कृत्रिम तलाव तयार केले पाहिजेत. जेणेकरून धार्मिक प्रथेमधे वापरले जाणारे सेंद्रिय पदार्थ नदीच्या प्रवाहात मिसळणार नाहीत. कृत्रिम तलावातील पाणी बदलले पाहिजे आणि या प्रदूषित पाण्यासाठी स्वतंत्र उपचाराची तजवीज केली पाहिजे.
- नदीच्या परिसंस्थेच्या संरक्षणासाठी, निर्माल्य किंवा इतर सेंद्रिय पदार्थ फेकणे थांबावे म्हणून जागृती कार्यक्रम योग्य पद्धतीने आयोजित करून अधिक कार्यक्षम केले पाहिजेत.
- टीव्ही, रेडिओ इ. सारख्या लोकमाध्यमातून छोट्या दृक्-श्राव्य फिती तयार करून प्रक्षेपण केले पाहिजे. पंचवटीच्या जवळ, जेथे लाखो भक्त भेटी देतात, तेथे " पर्यावरण संरक्षणाचे चांगले प्रघात " यांच्या वारंवार घोषणा केल्या पाहिजेत.
- " स्वच्छ पर्यावरण " अबाधित ठेवण्यासाठी मुलांचा सहभाग शाळांमध्ये वाढवला पाहिजे.
- नाले, उपनद्या अथवा आंशिक प्रवाह असलेली नदी यामधील अति प्रदूषित भागात, नदीमध्ये प्रदुषकांच्या प्रवेशाला प्रतिबंध करण्यासाठी, "फायटोरिड" किंवा " फ्लोटिंग वेटलँड" चे एक नवीन तंत्रज्ञान आत्मसात केल्या जाऊ शकते.

१४. अहवाला सोबत काम आणि वेळेचे प्रारूप असलेल्या प्रकल्पाचा प्रस्ताव आहे. कृती आराखडा तयार करण्यासाठी संपूर्ण कालावधीची चौकट १२ महिन्याची आहे आणि खर्च ८० लाख रुपये अधिक कर एवढा आहे.

१५. निरीच्या दुसऱ्या अहवालात तात्काळ कारवाई साठी विविध शिफारशी सांगितल्या आहेत ज्या अशा आहेत:

- वापरात असलेल्या विल्हेवाट पद्धती नाल्यामधून किंवा जमिनीतून विषारी औद्योगिक प्रदूषकाना कारणीभूत होतात. एमआयडीसी क्षेत्रातील सांडपाणी विसर्जन पद्धतीवर एमपीबीसीने कडक देखरेख ठेवली पाहिजे.
- औद्योगिक सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्याच्या बाजूने गत्यावरोध ठिकाणे तयार करण्याची गरज आहे जेणेकरून सांडपाणी एकतर उचलून अभिक्रीत केल्या जाईल किंवा जागीच अभिक्रीत केल्या जाईल.

- जलपर्णी परीणामकारकरित्या काढून टाकली पाहिजे.
- पाणी पुरवठा असलेल्या अधिक सार्वजनिक सौचालयांची सोय करून उघड मलविसर्जन व कपडे धुण्याविरुद्ध कारवाई तीव्र केली पाहिजे. पाण्याची उपलब्धता नसल्याने कपडे धुतले जातात. या भागात पाणी पुरवठा वाढवणे व जागृती अभियान हाती घेतले पाहिजे.
- आगामी कुंभमेळ्याच्या दृष्टीने भक्तांसाठी स्वच्छता सुविधा वाढवणे आवश्यक आहे. जेथे उघड मलविसर्जन सर्रास आहे त्या भागात सुलभ सौचालयांची संख्या वाढवली पाहिजे.
- नैसर्गिक आर्द्रभूमी आधारित “फायटोरिड तंत्रज्ञान” वापरून प्रतिधरण भिंतीच्या अलीकडे अवरोधित सांडपाणी जागीच अभिक्रीत केले पाहिजे.
- नदीच्या काठी बांधलेल्या, अडथळा आणणाऱ्या गटरला नाला जोडला पाहिजे.
- घरगुती कचरायुक्त आणि ताज्या पाण्याचा आंशिक प्रवाह असलेल्या अति प्रदूषित नाले व उपनद्या मधे योग्य ती सौम्यता होत नाही. नदीमधे प्रदुषकांचा प्रवेश कमी करण्यास्तव “फायटोरिड” किंवा “ फ्लोटिंग वेटलँड” चे नवीन तंत्रज्ञान आत्मसात केल्या जाऊ शकते. सांडपाणी उपचार सुविधा कार्यरत असल्या तरी हा उपचार झळाळी देण्याचे पाउल होऊ शकते.
- चोपडा पुलाच्या जवळ बांधकाम आणि घनकचरा साचवणे प्रतिबंधित केले पाहिजे कारण हा कचरा पावसाच्या पाण्याबरोबर नदीत जातो.
- जलपर्णी परिणामकारकरित्या काढून टाकली पाहिजे.
- वनस्पती कापून नदी बाहेर पूर्णपणे काढली पाहिजेत.
- जलपर्णी तृण छाटणी पद्धतीने परिणामकारकरित्या काढून टाकली पाहिजे आणि नदीच्या किनाऱ्यापासून दूर नेली पाहिजे.
- पुलांच्या जवळ निर्माल्य कलश ठेवले पाहिजेत.
- कचऱ्याचे  विसर्जन बंद व्हावे आणि नदीचा पर्यावरणीय दर्जा अबाधित रहावा म्हणून नदीच्या काठी नदीचे भाग/पट्टे दत्तक घेण्यासाठी लोकांचे गट तयार करण्याची शिफारस केली आहे.
- रामकुंड आणि बाजूच्या नदीच्या  भागात निर्माल्य व  घनकचरा विसर्जन,  कपडे धुणे यांस पोलिसांनी कडक प्रतिबंध केला पाहिजे.
- साठवलेला घनकचरा काढून टाकला पाहिजे.
- पोहणे,पाणी पिणे, भांडी अथवा कपडे धुणे या सारख्या ज्या कृत्यांमुळे शरीराचा पाण्याशी संबंध येतो त्या गांधी तलावात प्रतिबंधित केल्या पाहिजेत कारण अल्गीचा बहर विषारी असु शकतो. पाणी साचलेले नको.
- अल्गीचा बहर यांत्रिक पद्धतीने काढायला हवा.

- जागृती अभियान अधिक तीव्र केले पाहिजेत आणि त्याची परिणामकारक अंमलबजावणीवर देखरेख ठेवली पाहिजे. जागृती कार्यक्रमाच्या अर्थसंकल्पात प्रदूषण व इतर हानिकारक कृत्यापासून लोकांना परावृत्त करण्यासाठी कामगार/स्वयंसेवक यांचा गट समाविष्ट केला पाहिजे.
- साठवलेला घनकचरा आणि वनस्पती काढून टाकल्या पाहिजेत.
- सामान्य पर्यावरणीय जलप्रवाह अबाधित ठेवला पाहिजे जो सखोल अभ्यासातून रेखाटला जाऊ शकतो.
- फेस निर्मितीच्या कारणांच्या अभ्यासाची निकड आहे.
- मुख्य योजनेची अंमलबजावणी नदीपर्यंत पोहोचणाऱ्या उपचारविरहित घाणीचे परिमाण कमी करेल. तथापि न जोडलेले बरेच भाग आणि नाल्यात वाहणारा मैला व घनकचरा नदीच्या दर्जाची हानी चालूच ठेवील. मैला संकलन, स्थानांतरण व उपचार यांचे ग्रिडनुसार मूल्यमापन हाती घेण्याची शिफारस कली आहे, जेणेकरून संभवनीय उपचारविरहित घाण पाणी गोदावरी नदीत प्रवेश करेल अशी भविष्यात तृटी राहणार नाही.

१६. निरीचा तिसरा अहवाल आगामी कुंभमेळ्या मधे उद्‌भवणाऱ्या समस्यांचा सामना करण्या साठीच्या कृती आराखड्या विषयी आहे. निरीच्या शिफारशी व सूचना खालील प्रमाणे आहेत:

**<u>पाणी पुरवठा व्यवस्था</u>:**

(अ) पाणी पुरवठ्याच्या दर्जाची शाश्वतीसाठी तसेच निलीगिरीबाग व लुंगे मंगल-कार्यालय येथिल इलेक्ट्रोलायटिक क्लोरीनेटरस्/ सुधारित इएसआर या मधील मुळ जागी असलेले पॉट क्लोरीनेटरस् या द्‌वारे साथीच्या रोगाच्या संदर्भात संभाव्य प्रदूषण नियंत्रणासाठी, जेंव्हा लागेल तेंव्हा, अतिरिक्त निरजंतूकीकरण पद्‌धतींची तरतूद.

(ब) खास पर्वा दरम्यान जर क्लोरीन सिलिंडर्स चा तुटवडा भासला तर पर्यायी जंतुनाशकांची तरतूद, जसे, सोडियम डायक्लोरोआयसोसायन्युरेट(NaDCC), सोडियम ट्रोक्लोसीन, असे वेगवेगळ्या प्रकारचे क्लोरीन उपलब्ध आहेत.

(क) बदलत्या लोकसंख्येसाठी बांधलेल्या तलावाच्या ठिकाणी किंवा टँकर द्‌वारे पुरवठा करण्या करिता इलेक्ट्रोलायटिक क्लोरीनेटरस् पुरवल्या जाऊ शकतात.

(ड) तात्पुरत्या निवासस्थानात जमलेल्या लोकांच्या समूहांना सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी बॅच पोर्टेबल व्यवस्था म्हणून निरीने विकसित केलेल्या, “ निरी झार” तंत्रज्ञानाद्‌वारे निर्माण केलेल्या जलस्रोताचे शुद्‌धीकरण. हे ठिकठिकाणी आयोजित पारंपारिक उपचार सुविधा वरिल संख्यात्मक भार कमी करेल.

**घाण पाणी उपचार सुविधा:**

(अ) गंगापूर व पिंपळगाव येथील प्रस्तावित डब्ल्यूडब्ल्यूटीएफ करिता भूमी संपादनासाठी काही वाद आणि उशीर झाला आहे. शिवाय साधुग्राम मधे निर्माण झालेले घाण पाणी (जवळपास २४ एमएलडी) जुन्या व नवीन कपिला एसपीएस द्वारे तपोवन एसटीपी पर्यंत पोहोचणे योजिले आहे. परिणामस्वरूप, तपोवन डब्ल्यूडब्ल्यूटीएफ अतिभारित होईल जे सध्या तिच्या पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे. यामुळे कार्यात बिघाड होईल व फेस निर्मितीचा तसेच नदीच्या प्रदुषणाचा प्रश्न गंभीर होईल.

(ब) म्हणून नवीन डब्ल्यूडब्ल्यूटीएफचे बांधकाम सुचवलेले आहे जे तपोवन येथे अस्तित्वात असलेल्या डब्ल्यूडब्ल्यूटीएफ वर अतिरिक्त भर टाकण्याचे टाळेल तसेच मैल्याची निर्मिती होईल जे शिफारस केलेल्या बीओडी चे १० एमजी/एल पेक्षा कमी वा तेवढ्याच एमपीबीसी मापकाची पूर्तता करेल. नदीच्या पट्ट्याच्या बाजूने नदीच्या पाण्याचा दर्जा खालावणाऱ्या प्रदूषकांचा ठिकठिकाणी प्रवेश रोकला जाण्यासाठी जागीच नाला डब्ल्यूडब्ल्यूटीएफ ची अंमलबजावणी झाली पाहिजे.

(क) सध्याच्या डब्ल्यूडब्ल्यूटीएफ पासून मैलाचा दर्जा वाढवण्यासाठी आणि नवीन एमपीबीसी १० एमजी/एल बीओडी च्या मापकाशी समर्पकता येण्यासाठी आर्द्रभूमी , फायटोरिड सारखे पर्यावरण स्नेही तंत्रज्ञान उजाळा देणारे अथवा तृतीय स्तर उपचार म्हणून समाविष्ट करता येईल. तपोवन डब्ल्यूडब्ल्यूटीएफ येथे तिची व्यवहार्यता निश्चित करण्यासाठी निरीने यापूर्वीच प्रयोग सुरु केले आहेत. प्राथमिक परिणाम दर्शवितात कि फेस निर्मिती प्रश्न सोडवणुकी सह, बीओडी चे १० एमजी/एल चे खालचे परिमाण साध्य होऊ शकते.

(ड) उपचार विरहित घाण पाणी वाहून नेणाऱ्या नाल्यासाठी उदा. लेंडी नाला, चोपडा लॉन नाला, सोमेश्वर नाला इ., हे स्रोत डब्ल्यूडब्ल्यूटीएफ जोडले जाई पर्यंत, तात्पुरता उपाय म्हणून जागीच उपचार पद्धती अवलंबिली पाहिजे.

**आरोग्य व घनकचरा व्यवस्थापन:**

**(१) मलविसर्जनासाठी शौचालय पुरवण्याकरता विविध योजना रचित आहेत.**

(अ) विष्ठा निर्माण करणारे सुलभ शौचालय, तात्पुरते संडास, फिरते शौचालये या मधील मानवी मैलाच्या एकत्रित संकलनासाठी आणि स्नानगृहातील टाकाऊ पाण्यासाठी नवीन गटार बांधण्याऐवजी घाण स्वतंत्ररीत्या करडे पाणी आणि विष्ठा म्हणून संकलित केल्या जाऊ शकते.

(ब) पीएसआरटीचे बायो-डायजेस्टर आयआयटी तंत्रज्ञानाचा वापर फिरते शौचालये, सुलभ शौचालय आणि तात्पुरते संडास या मधील विष्ठेच्या उपचारासाठी

केला पाहिजे. या डायजेस्टर मधील मैला, उजाळा देण्याचे पाऊल म्हणून पुढे फायटोरिड तंत्रज्ञाना द्वारे अभिक्रीत करून नंतर नदीत विसर्जित केल्या जाऊ शकतो. हे डब्ल्यूडब्ल्यूटीएफ वरील अतिरिक्त भार कमी करेल जे जास्तीच्या भारामुळे बिघडेल.

(क) सुरक्षित आणि पर्यावरणस्नेही शौचालये विकसित केली आहेत आणि बाजारात उपलब्ध आहेत जे देखभाल मुक्त असून पारंपारिक उर्जा स्रोतावर अवलंबून न राहता कार्यक्षम आहेत. शौचालयाचा मैला निर्मळ, वास्तविक रित्या पॅथोजीन-मुक्त आणि उत्तम खत म्हणून वापरल्या जाऊ शकतो.

(ड) पर्यावरण स्नेही शौचालयांची कल्पना अलाहाबाद कुंभमेळ्या मधे वापरली होती.

**(२) आरोग्यदाई आणि स्वच्छ पर्यावरणीय स्थितीसाठी एनएमसी खालील व्यवस्था सुचवते:**

(अ) थोड्या कालावधी करिता पवित्र स्थळांना भेट देणाऱ्या सर्व भक्तांना वाहन तळाच्या पुढे निर्माल्य नेण्यास बंदी घालणे. योजना राबविण्याकरता असलेल्या स्वयंसेवकांसह, निर्माल्य कलश वाहन तळाच्या ठिकाणी, सार्वजनिक वाहतुकीकडे नेणाऱ्या प्रवेश मार्गावर ठेवणे. वाहन तळाच्या पुढे निर्माल्य नेण्यास बंदी घातली पाहिजे. निर्माल्य पाण्यापर्यंत नेण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक कॅरी बॅगची विल्हेवाट लावणे यामुळे टळेल.

(ब) नदीच्या प्रवाहात, रामकुंड, तपोवन सारख्या पवित्र स्थळांच्या प्रवाहाच्या खालच्या भागात, भक्तांनी विसर्जित केलेले तरंगते निर्माल्य गोळा करण्यासाठी जाळ्या लावणे. अशा वस्तूंचे परिणाकारक संकलन व विल्हेवाटीसाठी स्वयंसेवक उपलब्ध पाहिजेत.

(क) विविध ठिकाणांवरून संकलन केलेले निर्माल्य घरगुती घन कचऱ्या बरोबर विल्हेवाट लावण्यापेक्षा विभक्त करून वैद्यकिय वापरासाठी आणि गांडूळ खतासाठी स्वतंत्रपणे प्रक्रिया करता येईल (हिबीस्कस फुले वैद्यकिय तेल तयार करण्याकरता)

(ड) प्लास्टिकच्या वापरास बंदी केली पाहीजे आणि ज्यूट व कागदी पिशव्यांना उत्तेजन दिले पाहीजे.

**(३) सामाजिक जागृती:**

(अ) मंदिरांचे अधिकारी, खाजगी संस्था, एनजीओ, शालेय मुले आणि व्यक्तींना जनजागरण, प्रसिद्धी व जाहिरात याच्या त्यांच्या कल्पना विकसित करून अमलात आणण्यासाठी उत्साह आणि कल्पकता असलेला त्यांचा स्वतःचा गट करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहीजे. युवकांना या कामात सामाऊन घेतले पाहीजे.

(ब) समाजात पृथ्वी प्रती संरक्षण मूल्य वृंधिगत करावे उदा. पाण्याचा वापर कमी करणे, घरगुती निर्माल्य गोळा करणे आणि ते योग्य विसर्जनासाठी शालेय अधिकाऱ्याकडे सोपविणे, प्लास्टिक पिशवयाच्या बदली कागदी, कापडी पिशव्या तयार करणे या सारखे पर्यावरणाशी संबंधित प्रकल्प शाळमधे राबविणे.

(क) उच्चभ्रू आणि सुप्रसिद्ध व्यक्तींशी योजनेच्या मान्यतेसाठी जवळीक साधली पाहिजे.

(ड) शाश्वत प्रथांचा अंगीकार करावा:

ए] जेवतांना खाद्य पुरवण्याकरता जैविक-ऱ्हास होणाऱ्या प्लेट्स व कप्स

बी] जाहिरातीचे साहित्य मुद्रित करण्यासाठी परतचक्रीत कागदांचा वापर

(इ) सर्व लोकांसाठी पर्यावरणीय संदेश व माहिति असलेले होरडींग्स, बॅनर्स, पोस्टरर्स इ. नाशिक मधिल कुंभमेळा परिसरात लावले पाहीजेत.

(एफ) संगणकीय प्रसार माध्यमे, छापील साहित्य व जाहिराती, स्थानिक घोषणा, दूरदर्शन क्लिप्स द्वारे लोक जागृती अभियान आणि संपर्क हाती घेतले पाहीजेत. भारतातील प्रत्येक राज्याला पर्वाच्या कमीत कमी ६ महीने आधी जाहिरात स्वरूपातील व्हीडीओज, छापील साहित्य इ. पाठवले पाहीजे जेणेकरून पाण्याची काळजी व कुंभ मेळ्याच्या रुढीं यात्रेकरुंना माहिती होतील. प्रत्येक रेल्वे स्टेशन, बस-स्टँड व सार्वजनिक ठिकाणी सर्व भारतीय भाषांमधून संदेश प्रसारित झाला पाहीजे.

(जी) कुंभमेळ्याची जागा पोलीथीन व प्लास्टिक कचऱ्या पासून मुक्त ठेवण्या साठी हरित पर्वाचे बोधचिन्ह असलेल्या कागदी, कापडी पिशव्या अभ्यागतांना व पर्यटकांना दिल्या पाहीजेत.

(एच) कथाकारांच्या गटांना प्रशिक्षण द्या आणि हिंदुंच्या पर्यावरणाच्या संकल्पनांची सुधारीत/वाढीव समज यावी या उद्येशाने पर्यावरणाशी निगडीत कथांवर भर द्यावा. या वर्गात हिंदु साधुसंत यांचा समावेश होऊ शकतो जे भक्तांना समजाऊन सांगण्यात अधिक प्रभावी असू शकतात आणि पारंपारिक कथांचे सद्यकालीन महत्वाविषयी उत्तेजीत करण्याकरता दूरदृष्टीचे नवीन पैलू दाखवू शकतात

(आय) देवळातील पुजेमधे पर्यावरणीय जागृकता व परिमाणे याचा समावेश केल्याने सकारात्मक परिणाम होईल आणि त्याचा पुढील काळात घरात पूजापाठ करणारांच्या पद्धतीवर प्रभाव पडून त्या बदलतील.

(जे) देखभाल व जागरुकते करिता नदीचे भाग दत्तक घेण्यासाठी कंपन्यांचे सहकार्य घ्यावे.

महापालिकेस थोड्या शिफारशीवर काही किंतु असले तरी आम्हास कुठलीही शंका नाही कि सूचना अंमलात आणण्यासाठी सर्व संबंधीत प्रयत्न करतील.

१७. अंतरिम निर्देशांच्या संबंधाने ढ़ोबळ मानाने, खालील बाबींवर निर्देश हवे आहेत:

(१) सर्वसाधारणपणे आणि कुंभमेळ्या संबंधीच्या शिफारशिंची अंमलबजावणी;

(२) प्रदुषण महामंड़ळाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी;

(३) नाशिक महापालिकेने उचलावयाची पाउले;

(४) जनजागरण मोहिमेत लोक-सहभागाची खात्री करण्यासाठी नाशिक महापालिकेने उचलावयाची पाउले; आणि शेवटी,

(५) पुरेशा पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपलब्धतेसहित सुरक्षा प्रतिबंध.

१८ या न्यायालयाने संबंधीत जाब देणारयांना दिलेल्या निर्देशांवर सतत देखरेखेची आवश्यकता आहे. म्हणून आम्ही नाशिकच्या विभागीय आयुक्तांच्या मुख्यत्वाखाली एक समिती गठीत करत आहोत. विभागीय आयुक्त समितीचे अध्यक्ष असतील जिचे खालील सद्स्य असतील;

(अ) नाशिक महापालिकेचे आयुक्त;

(ब) नाशिक जिल्हयाचे जिल्हाधिकारी;

(क) महाराष्ट्र प्रदुषण महामंड़ळाने नामनिर्देशीत केलेले प्रतिनिधी;

(ड़) विभागीय आयुक्तांनी याचिकाकर्ते व महापालिका यांचा सल्ला घेउन नियुक्त केलेली तज्ञ व्यक्ति;

(क) निरीने नामनिर्देशीत केलेला प्रतिनिधी

१९. नाशिकचे विभागीय आयुक्त समितीचे समन्वयक/सचिव म्हणून उप-जिल्हाधिकारी यांच्या पेक्षा खालच्या दर्जाचे नसलेले त्यांच्या कार्यालयातील महसूल अधिकारी नेमतील. विभागीय आयुक्त आजपासून तीन आठवड़याच्या कालावधीत समितीचे गठन पूर्ण करतील. विभागीय आयुक्तांना समितीला मदत करण्यासाठी उप-समिती नेमण्याचा अधिकार राहील.

२०. आम्ही नाशिक महानगरपालिकेस निर्देश देतो कि विभागीय आयुक्तांनी मागणी केल्या प्रमाणे आवश्यक ते सचिव व इतर कर्मचारी समितीस कायम स्वरूपी उपलब्ध असतील याची खात्री करावी. स्थळाना भेटी देण्याकरिता समितीच्या सदस्यांना वाहने पुरवण्याची

व्यवस्था नाशिक महानगरपालिकाने करावी. आवश्यक स्टेशनरी, संगणके, प्रिंटर्स इ. नाशिक महानगरपालिके तर्फे या समितीस उपलब्ध करुन द्यावे.

२१. या न्यायालयाने पारित केलेल्या आदेशांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासन पुरेशा संख्येचा पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांचा समावश असलेला स्वतंत्र कक्ष कायदा व सुव्यवस्था, मुलकी अधिकारयांना व या न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीस मदत करण्याकरता  निर्माण करेल.

२२ नाशिकचे पोलिस आयुक्त, उप- पोलिस आयुक्त यांच्या पेक्षा खालच्या दर्जाचे नसलेले अधिकारी नेमतील जे गोदावरी नदिच्या संरक्षणा करिता वरीलप्रमाणे तैनात पोलिस दलाच्या कक्षाचे प्रमुख असतील. सध्या किमान एक पोलिस निरिक्षक, चार उप-पोलिस निरिक्षक व ३० पोलिस हवालदार असलेला कमीतकमी कर्मचारी वर्ग उपलब्ध करावा. कुंभमेळा दरम्यान साहजिकच मोठ्या संख्येने पोलिस कर्मचारी तैनात करावे लागतील ज्या विषयी सूचना नंतर दिल्या जातील.

२३. निरीने वेळोवेळी मागितलेली रक्कम अदा केली जाईल याची खात्री नाशिकचे पोलिस आयुक्त करतील. निरी सरळ महानगरपालिकेस बिले सादर करेल. काही अडचणी असल्यास, जरूर त्या सूचनांकरिता नाशिक महानगरपालिके व निरी दोघेही या न्यायालयास अर्ज करू शकतात. निरी अंतिम कृती आराखडा जुलै २०१४ च्या अखेर पर्यंत दाखल करेल.

२४. जो पर्यंत गंगापूर आणि पिंपळगाव बसवंत येथील एसटीपी च्या बांधकामाचा संबंध आहे, लवकरात लवकर भूमी संपादन करणे गरजेचे आहे. पिंपळगाव येथील एसटीपी च्या भूमी विषयी, भूमी  संपादन कायदा,१८९४ च्या कलम ४ चे उपकलम (१) अंतर्गत परिपत्रक काढले आहे. संपादन शक्यतो त्वरित आणि  कुठल्याही परिस्थितीत, आजपासून सहा आठवड्याच्या कालावधीत पूर्णत्वाला नेले पाहिजे.

२५. गंगापूर येथील एसटीपीच्या भूमी विषयी, या न्यायालयाच्या आदेशास आव्हान देण्यासाठी नाशिक महानगरपालिकेने सर्वोच्य न्यायालयात केलेली याचिका निकालात काढली आहे. या प्रकरणात देखील राज्य सरकार संपादनाची कार्यवाही  आजपासून सहा महिन्याच्या कालावधीत पूर्ण करेल.

२६. गंगापूर आणि पिंपळगाव येथील भूमी संपादन सुलभ करण्यास्तव नाशिक महानगरपालिका नुकसान भरपाई पोटीची आवश्यक रक्कम, जेंव्हा सांगीतले जाईल तेंव्हा, जिल्हाधिकारी आणि/किंवा संबंधीत महसूल अधिकारी यांचेकडे भरणा होईल याची खात्री करेल.

२७. आम्ही यापूर्वीच ५ जुलै २०१३ चा निरीचा अहवाल लक्षात आणून दिला आहे जो त्वरित कृतीसाठी शिफारशींची नोंद करतो. या शिफारशींची अंमलबजावणी आतापर्यंत झाली नसल्यास त्यांचे निष्ठने पालन करावे आणि त्यांची आजपासून दोन महिन्याच्या कालावधीत अंमलबजावणी करावी असे निर्देश आम्ही नाशिक महानगरपालिका, एमआयडीसी व महाराष्ट्र प्रदुषण महामंड़ळ (एमपीसीबी) यांना देतो.

२८. आम्ही नोंदवितो कि गोदावरी नदीचे जल प्रदुषण नियंत्रित करण्यासाठीचा कृती आराखडा राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. राज्य सरकार आजपासून तीन महिन्याच्या कालावधीत कृती आराखडयाच्या मसुद्यावर योग्य तो निर्णय घेइल. राज्य सरकार निरीच्या अहवालातील शिफारशींचा, ज्या या याचीकेच्या कागदपत्रात आहेत त्यांचा, योग्य निर्णय घेतांना विचार करेल.

२९. नाशिक महानगरपालिकेने दाखल केलेले पत्र क्र. ४८० /१३ च्या स्वरूपातील २० फेब्रुवारी २०१३ च्या, स्वतंत्र व वाहून घेतलेले गोदावरी संवर्धन खाते निर्माण करण्याकरता, कर्मचार्यांच्या मंजुरीसाठी दाखल प्रस्तावावर राज्य सरकार आजपासून दोन महिन्याच्या कालावधीत निर्णय घेइल.

३०. या न्यायालयाने पारित केलेल्या दि. २० ऑगष्ट २०१३ चा आदेश नोंदवितो कि सातपूर व अंबड येथील १० हलगर्जी उदयोगा संदर्भात महाराष्ट्र प्रदुषण महामंड़ळाने कारवाई केली आहे. महाराष्ट्र प्रदुषण महामंड़ळ कसुरवार उदयोगा विरुद्ध कारवाई करणे चालू ठेवेल आणि या न्यायालयास आजपासून तीन महिन्याच्या कालावधीत स्थिती-दर्शक अहवाल सादर करेल.

३१. आम्ही एमआईडीसीस निर्देश देतो कि सातपूर व अंबड या औदयोगिक क्षेत्रात सीइ पीटी लवकरात लवकर बसवली जाईल याची खात्री करावी. आम्ही हे स्पष्ट करतो कि जरी सीइ पीटी वापरणाऱ्या उदयोगांची तिचा खर्च उचलण्याची इच्छा नसली तरी एमआईडीसीने स्वतःहून सीइपीटी बसवण्यासाठी पाउले उचलावीत. सीइपीटी बसवण्या संदर्भात एमआईडीसीने आजपासून तीन महिन्याच्या कालावधीत कार्यवाही अहवाल दाखल करावा.

३२. या आदेशाच्या आधिच्या भागात म्हणल्या प्रमाणे नागरिक त्यांची मुलभूत कर्तव्ये पार पाडतील याची खात्री करण्यासाठी नाशिक महानगरपालिका एक व्यापक जनजागरण कार्यक्रम तयार करून त्याची अंमलबजावणी करेल. नाशिक महानगरपालिकेने एनजीओ तसेच शहरातील शाळा व महाविद्यालये यांची जनजागरण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याकरता मदत घ्यावी असे निर्देश आम्ही देतो. नाशिक महानगरपालिका जनजागरणाचा भाग म्हणून विधी महाविद्यालये व जिल्हा कायदेविषयक सेवा अधिकार मंडळाच्या सहाय्याने चर्चासत्रे, पथनाट्ये यांचे आयोजन करेल.

३३. कचरा किंवा इतर कोणतीही वस्तू नदीत न फेकण्याविषयी लोकांना आवाहन करणारी पूरेशा आकारातील फलके व्यूहात्मक ठिकाणी लावण्यासाठी आम्ही नाशिक महानगरपालिकेस निर्देश देतो. गोदावरी नदी प्रदुषण मुक्त राखण्यासाठी जनतेने त्यांची मुलभूत कर्तव्ये पार पाडावीत असे आवाहन फलकामधे असेल.

३४. अंत्यसंस्कारा दरम्यान अस्थी व इतर सेंद्रीय पदार्थांचे विसर्जन करण्यासाठी पूरेशा संख्येने कायम कृत्रिम तलावाची सुविधा नाशिक महानगरपालिका उपलब्ध करेल. आम्हास याची जाणीव आहे कि या कामासाठी कृत्रिम तलावाचा वापर सक्तीचा केला जाऊ शकत नाही, परंतु तरी देखिल नाशिक महानगरपालिका हि सुविधा दोन महिन्यात निर्माण करेल आणि ही सुविधा उपलब्ध आहे यास व्यापक प्रसिद्धी देइल. गोदावरी नदीच्या भोवताली, व्यूहात्मक ठिकाणी, कृत्रिम तलावाची सुविधा उपलब्ध आहे अशी माहिती जनतेस देणारी फलके उभारली जातील. कृत्रिम तलावाचा वापर करावा असे तळमळीचे आवाहन फलकामधे असेल.

३५. त्याच प्रमाणे गणेश उत्सवात गणेश मुर्तींचे विसर्जना वेळी आणि नवरात्री उत्सवात दुर्गा मुर्तींचे विसर्जना वेळी कृत्रिम तलाव निर्माण केले जातील. कृत्रिम तलावाच्या उपलब्धतेविषयी आगाऊ प्रसिद्धी दिली जाईल आणि या तलावाचा वापर करावा असे जनतेस आवाहन करायला पाहिजे. इतर अनेक शहरा प्रमाणे, विसर्जनासाठी भक्तांकडुन मूर्ती स्वीकारण्यासाठी विविध ठिकाणी केंद्रे नाशिक महानगरपालिके तर्फे स्थापन केली पाहिजेत. त्यानंतर मुर्ती विसर्जनामूळे प्रदुषण होणार नाही अशा प्रकारे सर्व मूर्ती, महानगरपालिके तर्फे विसर्जित केल्या जाऊ शकतात.

३६. निर्माल्य व इतर सेंद्रीय पदार्थांच्या विषयी, मोठी पात्रे, निर्माल्य किंवा इतर सेंद्रीय वस्तू नदीत न फेकण्याविषयी तसेच त्या विशेष करून त्याच हेतूकरता पुरवलेल्या पात्रातच टाकाव्यात असे आवाहन लोकांना करणारी फलके असलेल्या सोयीच्या जागी ठेवली जातील.

३७. वस्तू नदीत फेकण्यास प्रतीबंध करण्यासाठी नदीवरिल पुलाच्या दोन्ही बाजूने कठडे उभारले पाहीजेत. वाहने नदीच्या पात्राजवळ धुण्यासाठी आणली जाणार नाहीत याची खात्री करण्यासाठी नाशिक महानगरपालिके कडून विशिष्ट प्रवेशाच्या जागी कठडे उभारले जातील.

३८. निरीच्या पहिल्या दोन अहवालातील सूचनांच्या अंमलबजावणी संबंधीत पक्षकारांनी दाखल केलेली प्रतिज्ञापत्रे रेकॉर्ड वर आहेत. आमचा दृष्टीकोन असा आहे कि निरीच्या पहिल्या अहवालातील परिच्छेद ११ मधील सूचना अंमलबजावणी योग्य आहेत. आमचा असाहि दृष्टीकोन आहे कि दुसऱ्या अहवालातील सुचवलेल्या उपाय योजना देखिल अमलात आणल्या पाहिजेत. निरीच्या सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी पाउले उचलावीत असा निर्देश आम्ही सर्व संबंधीत अधिकाऱ्याना देतो.

३९. या आदेशांतर्गत नियुक्त केलेली समिती निरीच्या पहिल्या दोन अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संबंधी सर्व संबंधीत अधिकाऱ्यानी केलेल्या कारवाईचे परीक्षण करेल. समिती या न्यायालयास ५ मे २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी अहवाल दाखल करेल.

४०. २०१५ मधील कुंभेळयासंबंधी बारकडुन माहिती देण्यात आली आहे कि विविध प्रकारची कामे करण्यासाठी राज्य सरकारने निधी मंजूर केला आहे. राज्य सरकारने विविध शिफारशी असलेले निरीचे दाखल केलेले अहवाल विचारात घ्यायला पाहिजेत. आम्ही जिल्हाधिकारयांना निर्देश देतो कि निरीच्या तिसऱ्या अहवालाच्या दृष्टीकोनातून राज्य सरकारने घेतलेला निर्णय रेकॉर्ड वर आणण्यासाठी प्रतिज्ञापत्र दाखल करावे. हे प्रतिज्ञापत्र ३० जून २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी दाखल करायला पाहिजे.

४१. या न्यायालयाने नियुक्त केलेली समिती या न्यायालयास या न्यायालयाने जारी केलेल्या निर्देशांची अंमलबजावणी तसेच निरीच्या शिफारशींच्या अंमलबजावणी संबंधी नियतकालिन अहवाल प्रत्येक दोन महिन्यांनी दाखल करेल. वर निर्देशित केल्याप्रमाणे पहिला अहवाल ५ मे २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी दाखल केला जाईल.

४२. आम्ही हे स्पष्ट करतो कि या न्यायालयाने वेळोवेळी जारी केलेले निर्देश जे ह्या निर्देशांशी विसंगत नाहीत ते या क्षेत्रात कायम राहतील.

४३. याचिकाकर्ते व याचिकेतील पक्षकार यांना पुढचे निर्देश आणि/किंवा निर्देशांचा बदल यासाठी अर्ज करण्याची मुभा असेल.

४४. हि याचिका "निर्देश" या शीर्षकाखाली ६ मे २०१४ रोजी विविध अहवालांचा विचार करण्यासाठी ठेवावी.

(न्या.एस.सी.गुप्ते )　　　　　　　　( न्या. ए.एस.ओक )

snk/१६-३

ò

--